# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३५२/२०२३ दिनांक – १२/१०/२०२३

## प्रायव्हेट डान्स शोच्या नावाखाली देहव्यापार चालविणारे पती पत्नी यांच्यावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई

दि. ११/१०/२०२३ रोजी आम्हाला आमचे बातमीदारकडून वेश्यादलाल नामे आयान व त्याची साथीदार ज्योती उर्फ असे दोघे मिळुन वेश्याव्यवसाय करीत असुन ते इवेन्ट ॲण्ड स्टेज डान्स शोच्या मुली असल्याचे पुरुष गिऱ्हाईकांना सांगुन वेश्यादलाल आयान याचे मोबाईल क्रमांकावर पुरुष गिऱ्हाईकांनी संपर्क करुन वेश्यागमनासाठी मुलींची मागणी केली असता, मुलींचे फोटो मोबाईल व्हाटस्ॲपवर पाठवुन वेश्यागमनाचा मोबदला व कमिशन ठरवुन त्यांना स्वत: कारने गोवा, बैंगलोर, लोणावळा, मुंबई, ठाणे व मिरा-भाईंदर परिसरातील लॉजमध्ये गिऱ्हाईकास रुम बुक करावयास लावुन किंवा गिऱ्हाईकाचे सोयीनुसार एका मुलीचा वेश्यागमनाचा मोबदला व कमिशन असे एकुण २०,०००/- रु घेवुन पुरुष गिऱ्हाईकास वेश्यागमनासाठी मुली पुरवितात.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशी बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावुन वेश्यादलाल आयान उर्फ मो. शाहरुख खान याने सांगितल्याप्रमाणे जी.सी.सी.क्लब जवळील यु.एस. ओस्तवाल इंग्लीश ॲकेडमी (स्कुल), गेट नं.०२ जवळ, हाटकेश, काशिमिरा या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन १६.१५ वा. छापा टाकला असता, वेश्यादलाल आयान उर्फ मो. शाहरुख खान व त्याची पत्नी ज्योती उर्फ रेहाना सुलताना यांनी आपसात संगणमत करुन इन्वेट ॲण्ड स्टेज डान्स शोच्या नावाखाली ०३ पिडीत यांना स्वत:च्या ब्रिजा कार हिचेतुन सोबत आणुन वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाच्या बोलीवर रक्कम ठरवुन स्वत:च्या उपजिवीकेकरीता रक्कम ज्योती उर्फ रेहाना सुलताना हिचे मार्फतीने स्विकारल्याने त्यांना सापळयातील रोख रक्कम व इतर मुद्देमालासह ताब्यात घेवुन ०३ पिडीत मुलींची सुटका करुन संरक्षणार्थ रेस्क्यु फाऊंडेशन, कांदिवली (प.), मुंबई येथे ठेवण्यात आले आहे. सदर बाबत दोन पंचासमक्ष पंचनामा केला असून सफौ/रामचंद्र शिवाजी पाटील यांनी ताब्यातील वर नमुद आरोपी यांच्याविरुध्द सरकार तर्फे फिर्याद दिल्याने काशिमिरा पोलीस ठाण्यात भा.द.वि.स कलम ३७०,३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे दिनांक १२/१०/२०२३ रोजी गुन्हा नोंद दाखल आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.समीर अहिरराव, स.फौ.उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पो.हवा.किशोर पाटील, पो.अं.केशव शिंदे, चा.पो.हवा. सम्राट गावडे, म.पो.अं.अश्विनी भिलारे सर्व नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर यांनी केली आहे.